# बृहन्मुंबई महानगरपालिका

**घनकचरा व्यवस्थापन खाते 'ई' विभाग**

**सहा. अभि./ई/९१२९/घकव्य. दि.२९.०७.२०२५**

विषय:- ई विभागामध्ये दुपार पाळीमध्ये 2nd स्विपींगकरीता वुमन आर्मी (PINK WOMEN ARMY) उपक्रम अंतर्गत साफसफाई करण्याकरीता रस्ते स्वच्छता योजने अंतर्गत सोडत पध्दतीने ई विभागातील स्थानिक संस्थांची नियुक्ती करणेबाबत.

**"स्वारस्य अभिव्यक्ती"**

ई विभागामध्ये दुपार पाळीमध्ये 2nd स्विपींगकरीता वुमन आर्मी (PINK WOMEN ARMY) उपक्रम अंतर्गत साफसफाई करण्याकरीता रस्ते स्वच्छता योजने अंतर्गत सोडत पध्दतीने ई विभागातील स्थानिक/ई विभागात मनपाच्या कामात कार्यरत असलेल्या संस्थांमार्फत नेमणूक करण्याबाबत. ई विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या इच्छुक स्थानिक/ई विभागात मनपाच्या कामात कार्यरत असलेल्या नोंदणीकृत सहकारी संस्था,सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा, सहकारी संस्था, अशासकीय संस्था इ. संस्थेमार्फत स्वयंसेवकांचा पुरवठा करण्याकरिता संस्थेची निवड, पात्रता यादी तयार करुन सोडत पध्दतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवित आहे.

| अनु. क्र. | योजनेचे नाव | कामासाठी निवड करावयाच्या संस्था | निविदा फॉर्म रक्कम |
|---|---|---|---|
| १. | ई विभागामध्ये दुपार पाळीमध्ये 2nd स्विपींगकरीता वुमन आर्मी (PINK WOMEN ARMY) उपक्रम अंतर्गत साफसफाई करण्याकरीता रस्ते स्वच्छता योजने अंतर्गत सोडत पध्दतीने ई विभागातील स्थानिक संस्थांची नियुक्ती.<br>(DMC Zone-1/ MDB No.३१२२.Dtd.२८.०७.२०२५) | ०२ | रु. ३,६३०/- + (१८% जी.एस. टी) |

अर्जाचा नमुना **ई** विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे वरील तक्त्यामध्ये दिलेल्या निविदा फॉर्म रक्कम रोख स्वरुपात किंवा राष्ट्रीयकृत बॅकेचा डी.डी. बृहन्मुंबई महानगपालिका **(Municipal Corporation of Greater Mumbai)** या नावाने (ना-परतावा) नागरिक सुविधा केंद्र **(C.F.C.)** येथे जमा केल्यानंतर अर्ज दि.२९.०७.२०२५ ते दि.३०.०७.२०२५ सकाळी १०.३० ते संध्याकाळी ०४.३० (दुसरा व चौथा शनिवार वगळून) या वेळेत मिळु शकेल. पात्र संस्थांची यादी व सोडतीचा दिनांक 'ई' विभाग कार्यालय येथे सूचना फलकावर लावण्यात येईल. पात्र संस्थांच्या यादीमधुन सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या संस्थाना कामाचे वाटप संबंधित विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील, प्रत्येक कामासाठी स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र रक्कम भरणे आवश्यक आहे.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी 'ई' घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क साधावा. संस्थंने **ई** विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारिख दि.३१.०७.२०२५ दुपारी ०१.०० वाजेपर्यंत आहे.

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

सही/-

सहा.अभि.(घकव्य) 'ई' विभाग